**K.P.C. PUBLIC SCHOOL, KHARGHAR**

**ASSESSMENT – 2 (2022-23)**

**GRADE: III** **MARKS: 40**
**SUB: MARATHI** **TIME: 2 HRS**

---

**प्रश्न १. खालील पठित उतारा वाचून दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.** **(५)**

> 'पिक्सी' नावाचं जादूचं राज्य होतं. त्यात खूप साऱ्या पऱ्या रहायच्या. जादुगार रहायचे. खूप अद्भूत होतं ते राज्य. त्या राज्यात जादूच्या शाळा होत्या, बगीचे होते. इतकेच काय जादूची घरं आणि बाजारही होते. राज्यातला सगळ्या पऱ्या, छोटे छोटे जादुगार रोज शाळेत जादू शिकण्यासाठी जायचे. तिथे अभ्यास करायचे, खेळायचे, मस्ती करायचे.

**अ) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

१. राज्यातल्या सगळ्या पऱ्या,छोटे छोटे जादुगार रोज ________ जादू शिकण्यासाठी जायचे.

२. जादूची घरं आणि _______ होते.

**आ) खालील प्रश्नांची एक-दोन शब्दांत उत्तरे लिहा.**

१. जादूच्या राज्याचे नाव काय आहे?

२. पिक्सी राज्यात कोण रहायचे?

३. पिक्सी राज्य कसे होते?

**प्रश्न २. खालील शब्दांचे अर्थ लिहून वाक्यात उपयोग करा.** **(४)**

१. जिन्नस –

२. इनाम –

**प्रश्न ३. योग्य ते कारण लिहा.** **(४)**

१. कापसाचे फूल सर्वात श्रेष्ठ आहे.

२. बादशाह बिरबलाच्या उत्तराची वाट पाहू लागला.

**प्रश्न ४. खालील प्रश्नांची एक-दोन शब्दांत उत्तरे लिहा.** **(५)**

१. परी आजीबाई कशा होत्या?

२. कापसाच्या फुलाचा रंग कोणता?

३. दरबारात कोण उपस्थित नव्हता?

४. चिंगी कोण होती?

५. आजीने चिंगीला किती रंगाच्या थैल्या दिल्या होत्या?

**प्रश्न ५.खालील अपठित उतारा वाचून दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.** **(५)**

> चिमणी एक लहान पक्षी आहे. ती चिवचिव चिवचिव असा आवाज करते. टुणटुण उड्या मारते.चिमणी झाडावर घरटे बांधते. ती धान्य खाते.ती आपल्या पिलांना दाणे भरवते.जरा आवाज झाला, तरी भुर्रकन उडते. चिमणीला आपण 'चिऊताई' असे म्हणतो. लहान मुलांना चिऊताईच्या गोष्टी सांगतात.

**अ) चूक की बरोबर ते लिहा.**

१. चिमणी भुर्रकन उडते.

२. चिमणी घरात घरटे बांधते.

**आ) खालील प्रश्नांची एक-दोन शब्दांत उत्तरे लिहा.**

१. चिमणी हा कसा पक्षी आहे?

२. चिवचिव असा आवाज कोण करते ?

३. चिमणी काय खाते ?

## व्याकरण विभाग

**प्रश्न ६.अ)खालील अंक अक्षरात लिहा.** **(२)**

१. ४ - २. १६ -

**आ)खालील प्राण्यांची घरे लिहा.** **(३)**

१.  २.  ३. 

**इ) खालील प्रत्येक शब्दांचे वचन ओळखा. (एकवचन-अनेकवचन)** **(३)**

१. मुलगा - २. फुले - ३. पिशव्या-

**ई) खालील शब्दांचे वचन बदला.** **(२)**

१. ससा - २. शाळा -

## <u>लेखन विभाग</u>

**प्र ७. खालील चित्रांचे निरीक्षण करून त्याचे वर्णन लिहा. (कोणतेही एक)** **(३)**

१.  किंवा २. 

**प्रश्न ८. पुढील चित्र पाहा व दिलेल्या शब्दांच्या आधारे निबंध लिहा. (कोणताही एक)** **(४)**

१. माझा आवडता पक्षी – पोपट



(सुंदर पक्षी, रंग हिरवा, चोच लाल व बाकदार, मानेवर पट्टा, ढोलीत राहतो, पेरू व मिरची, मिठू मिठू बोलतो)

किंवा

२. पावसाळा



(प्रसन्न वातावरण, झाडे टवटवीत आणि हिरवी, विहिरी-नदी भरतात, सुंदर धबधबे, शेतात पिके, पावसात भिजणे, कागदाच्या होडया, अन्न-पाणी मिळते, सर्वजण आनंदी)

*******************************************************